: प्रकरण पहिले :

# मराठी कथावाङ्मयाची वाटचाल
# आणि
# तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान

प्रकरण पहिले:

# मराठी कथावाङ्मयाची वाटचाल आणि तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान

## १.१. प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रबंधिकेच्या ह्या पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कथावाङ्मयाची वाटचाल व तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान असा विचार करावयाचा आहे.

## १.२. मराठी कथावाङ्मयाची वाटचाल :

मराठी कथावाङ्मयाची वाटचाल विचाराता घेता तिच्या वाटचालीचे प्रामुख्याने सहा टप्पे पाडावे लागतात. ते पुढीलप्रमाणे :

१. उदय ते इ. स. १८००
२. इ. स. १८०० ते १८८५
३. इ. स. १८८५ ते १९२५
४. इ. स. १९२५ ते १९४५
५. इ. स. १९४५ ते १९६०
६. १९६० नंतरची कथा

*१. उदय ते इ. स. १८००*

'कथा' हा वाङ्मयप्रकार फार जुना आहे. आदिकाळापासून तो कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात असल्याचा आढळतो. जगातील कोणत्याही भाषेतील वाङ्मय तपासले, तरी त्याचा पाया हा कथात्मक असल्याचे आढळते. ह्याचा अर्थ असा की, 'कथा' हा कृत्रिम वाङ्मयप्रकार नसून तो मानवी प्रवृत्तीशी निगडित असा एक जिवंत व मूलभूत वाङ्मयप्रकार आहे. इंदुमती शेवडे ह्यांनी म्हटले आहे, ''कथानाची वा निवेदनाची आवड ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. आपले विचार प्रकट करण्यासाठी भाषेचे साधन प्राप्त होताच मानवाने गोष्टी सांगायला सुरूवात केली.''[१]

भारत हा कथाप्रिय म्हणून नावाजलेला देश असून भारतीय कथावाङ्मयला हजारो वर्षांची परंपरा आहे. रामायण-महाभारतादि महाकाव्ये, बौध्द जातके, जैन वाङ्मय, अद्भुत कथा इत्यादी स्वरूपामध्ये भारतीय कथावाङ्मय अंतर्भूत आहे. मौखिक कथा, लिखित कथा व अर्वाचीन कथा असा कथेचा विकास होत गेला. लोककथेच्या अभ्यासकांनी दैवतकथा किंवा दंतकथा,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अद्भुतकथा किंवा परिकथा, प्राणिकथा किंवा नीतिकथा, बोधकथा किंवा धर्मकथा असे कथेचे चार प्रकार पाडले. मराठी कथांना हा समृध्द वारसा मिळालेला आहे.

कथा हा साहित्याचा काव्याइतकाच प्राचीनतम प्रकार असून बहुतेक प्राचीन काव्य कथात्मक होते. मानवाच्या मानसिक व सांस्कृतिक विकासाबरोबर तिचा विकास होत गेला. जीवनाशी निगडित सृष्टीतील सर्व घटकांच्या समन्वयातून कालपरत्वे अखिल जगातील कथाविश्व साकारत गेले. पद्याबरोबरच यथावकाश गद्यातही काही स्वतंत्र कथा लिहिल्या गेल्या. मौखिक लोककथा पुढे ग्रंथात समाविष्ट होऊन कथेची पात्रे विस्तारत गेली. मनाची क्षुद्रता आणि निसर्गाचे विराट रूप हा सुरूवातीपासून मानवाच्या भीतियुक्त कुतूहलाचा विषय होता व त्याविषयीच्या आपल्या भाव-भावना मानवाने कथेतून गुंफल्या. ह्या कथांना दैवतकथा म्हणून आज संबोधले जाते. ह्या दैवतकथा विविध धर्मातील पुराणे व तत्कालीन धार्मिक ग्रंथांमधून समाविष्ट केल्या आहेत. सर्वसामान्यांच्या दृष्टीने ह्या दैवतकथांचे महत्त्व अनन्यसाधरण आहे. कालपरत्वे ह्या कथा विविध धार्मिक ग्रंथांमधून पुढे आल्या. लोकांच्या कुतुहलाचाच नव्हे, तर त्यांच्या श्रध्देचाही त्या विषय बनल्या.

प्राचीन कथा काही प्रमाणात अलिखित आहेत. यादवकाळात महानुभाव साहित्यात प्रसंगानुरूप कथा निर्माण झाल्या. ह्या पंथातील पंडितांनी गद्याच्या माध्यमाला अधिक प्राधान्य दिले, हे विशेष उल्लेखनीय आहे. सुटसुटीत वाक्यरचनेच्या लोककथा आणि नीतिकथा त्या काळात प्रसिध्द होत्या. आपल्या अनुयायांना उपदेश करताना चक्रधरांनी काही रंजक गोष्टी सांगितल्या. ह्या दृष्टांतपर गोष्टींचे संकलन 'दृष्टांतपाठ' ह्या नावाने झाले. ह्यातील विविध दृष्टांत म्हणजे स्वतंत्र कथा आहेत. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात केशिराजबासांनी 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ लिहिला. त्यातील 'हस्तीचा दृष्टांत', 'मासळीएचा दृष्टांत' हे दृष्टांत मराठी कथेला एकदम जवळचे आहेत.[२]

## २. इ.स. १८०० ते १८८५ :

हा कालखंड अव्वल इंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो. ही अर्वाचीन कथेची बाल्यावस्था होय. शिक्षणाचे माध्यम मराठी, मनोरंजनपर कथांमधून शिक्षणप्रसार ह्यामुळे मिशनऱ्यांनी नीतिकथेच्या माध्यमातून धर्मप्रसाराची शिकस्त चालविली. मुद्रणाच्या सोयी उपलब्ध झाल्यानंतर अर्वाचीन मराठी कथेचा प्रथम आविष्कार झाला. दरम्यानच्या प्राचीन परंपरा खंडित होऊन भाषांतराचे मोजकेच पीक आले. राजवट इंग्रजी असली, तरी इंग्रजीबरोबरच फार्सी, उर्दू व संस्कृत ह्या भाषांमधील कथांचे मराठीत भाषांतर करण्याचे प्रयत्न झाले. म्हणून ह्या कालखंडाला 'भाषांतरयुग' म्हणतात.

अर्वाचीन मराठी कथारचनेला तंजावर येथून प्रारंभ झाला. सर्फोजीराजांनी इ.स. १८०८ मध्ये पदरी असलेल्या सखखन पंडितांकडून इसापनीतिचे 'बालबोध मुक्तावली' हे मराठी भाषांतर छापवून प्रसिध्द केले. ह्याशिवाय 'पंचतंत्र' (१८०५), 'हितोपदेश' (१८१५), 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' (१८१६), 'सिंहासनबत्तिशी' (१८२४) हे ग्रंथ वैजनाथ पंडितांनी लिहिले. 'इसापनीती'चे आणखी एक भाषांतर स.का. छत्रे ह्यांनी १८२८ साली 'इसापनीती कथा' ह्या नावाने केले. बार्किन्सच्या 'चिल्ड्रेन्स् फ्रेंडस्' ह्या मूळ फ्रेंच ग्रंथाचे इंग्रजीवरून सरकारी विद्या खात्याने 'बालमित्र, भाग - १' छत्र्यांच्या नावावर व दुसरा गेस्फर्डच्या नावावर शालेय विद्यार्थी समोर ठेवून लेखन केले.

१८४१ साली हरी केशवजी पठारे ह्यांनी जॉन बन्यनच्या 'Pilgrim's progress' ह्या धार्मिक कथेचे भाषांतर 'यात्रिकक्रमण' ह्या नावाने केले. ख्रिस्ती वळणाची भाषा वापरलेल्या ह्या ग्रंथात " इहलोकापासून परलोकास केलेले हे यात्रिकक्रमण स्वप्नाच्या रूपाने कथिले असे", अशी ग्वाही मथळ्यात दिली. 'नीतिदर्पण' ने 'बालबोधकथा' लेखक विष्णुशास्त्री बापटांना स्वतंत्र पुस्तक लिहिल्याचा पहिला मान मिळवून दिला.

'शुक बाहातरी' सारख्या शृंगारकथांचा हेतू मनात ठेवून डॉ. रामजी गणोजी ह्यांनी इ.स. १८५४ साली 'स्त्रीचरित्र' हा ग्रंथ लिहिला. 'नारायणबोध' हा त्यांचा दुसरा ग्रंथ. ह्या सर्व कथा बाळबोध आहेत. ह्यात उठून दिसावी अशी १८६१ ते १८६५ मध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या डौलदार शैलीने 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' ची आकर्षक मांडणी केली.

इ.स. १८५४ - ५५ मध्ये कृष्णराव माधवराव प्रभू ह्यांनी डंकन फोर्बसच्या इंग्रजी भाषांतरावरून सात कूट प्रश्नांचा 'हातिमताई चरित्र' हा ग्रंथ लिहिला. ह्यात त्यांनी 'गुलबकावली' प्रमाणे अद्‌भुतरम्य वातावरणाने वाचनीयता आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ह्या मालिकेत वि. ना. भागवतांचा 'दुर्दैवी मुराद व दैववान सलाउद्दीन' (१८६२), नारो गोडबोल्यांचा 'बहारदारनिष' (भाग १ - २. १८६६ - ६७), डेविड होइमने रूपांतरित केलेला 'गुलवसनोवर' (१८६९), वि. स. नवलकरकृत 'गुलबकावली' (१८७३) व गो. भि. पटवर्धनकृत 'गुलिस्ता' (१८८४) हे सर्व ग्रंथ कमीअधिक प्रमाणात वास्तवतेपासून दूर, अद्‌भुतरम्य व अतिरंजित आहेत.

### *३. इ.स. १८८५ ते १९२५ :*

कथावाङ्‌मयाच्या दृष्टीने हा कालखंड अधिक लक्षात घेण्यासारखा आहे. ह्या कालखंडापर्यंत कथावाङ्‌मय अद्‌भुतरम्य वातावरणात रमलेले दिसते. तत्कालीन समाजाची वाङ्‌मयाची अभिरूची पण ह्याच प्रकारची होती. त्यामुळे कथावाङ्‌मयाचे कलात्मक आणि वाङ्‌मयीनदृष्टया मूल्यमापन करण्याचा

हा कालखंड नव्हता. त्या कथावाङ्मयाला लोकवाङ्मयाचे स्वरूप होते. म्हणून तर चमत्कारिक व अवास्तव घटनाप्रसंगांचे वर्णन कथावाङ्मयातून जाणवते.

१८८५ पासून मात्र कथेला अद्भुत-काल्पनिक विश्वातून बाहेर काढण्याचे प्रयत्न खऱ्या अर्थाने हरिभाऊ आपटे ह्यांनी केले. प्रत्यक्ष जीवनातील घटना व प्रसंग विस्तृतपणे व तपशीलवार मांडून हरिभाऊंनी कथालेखन केले. हरिभाऊंच्या कथांमधून पाल्हाळ, तपशीलवार वर्णने व पुनरावृत्ती हे दोष आढळत असले; तरी ही कथा वास्तवाच्या अनुभूतीचा आविष्कारच होती. वास्तवता व काल्पनिकता ह्यांच्यातील फरक वाचकांच्या लक्षात येऊन कथावाङ्मयाचे आकर्षण वाढू लागले. वास्तव जीवनाचा पुन:प्रत्यय घेण्याचा आस्वाद हरिभाऊंची कथा देऊ लागली.

१८८५ ते १९२५ ह्या कालखंडात अनुक्रमे 'करमणूक' व 'मनोरंजन' ह्या दोन नियतकालिकांचा उदय झाला. ह्या नियतकालिकांमधून हरिभाऊंच्या कथा प्रकाशित होऊ लागल्या. १८९० ला हरिभाऊंनी 'करमणूक' सुरू केले व त्यातून प्रकाशित होणाऱ्या मराठी कथेला खऱ्या अर्थाने वाचक प्रिय बनवले. ह्या बरोबर 'लोकमित्र', 'सुशील', 'महाराष्ट्रकोकीळ', 'खरा प्रकार', 'शालापत्रक', 'बालांकुर' ह्यांनीही गोष्टी प्रकाशित करायला सुरूवात केली. ह्यात 'लोकमित्र' विशेष उल्लेखनीय ठरले. हरिभाऊंच्या कथांमधून प्रत्यक्ष जीवनातील सुखदु:खे येऊ लागली. समाजातील सुखदु:खे व हरिभाऊंच्या कथांमधील सुखदु:खे ह्यात साम्य आढळू लागले. समाजजीवनातील सुखदु:खांचे बारीकसारीक प्रसंग हरिभाऊ साध्या - सरळ भाषेत अचूक पणे नोंदवू लागले आणि त्यांच्या कथेने मोठया प्रमाणात वाचकवर्ग मिळवला. ती वाचकांचे लक्ष वेधून घेऊ लागली. १८९० ते १९१० ह्या कालखंडात कथेच्या क्षेत्रात त्यांच्या 'करमणूक' चे अधिराज्य होते. त्यांच्या 'स्फुट गोष्टी' ह्याच नियतकालिकामधून पुढे प्रकाशित होऊ लागल्या. उदा. 'डिस्पेप्सिया', 'पहिले भांडण', 'दोन मित्र' इ. 'स्फुट गोष्टी' नी काही प्रमाणात का होईना त्यांच्या काळावर ठसा उमटविला व त्यांच्या कल्पनेने वाचकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. त्यांनी मोपॉसॉच्या 'नेकलेस' वरून 'पुरी हौस फिटली' ही कथा लिहिली. तसेच 'थोड्या चुकीचा घोर परिणाम' किंवा 'उपकाराची फेड अपकाराने' ह्यासारख्या छोटेखानी कादंबरीवजा कथा त्यांनी लिहिल्या. कथा म्हणजे जी कादंबरीइतकी प्रदीर्घ नाही ती, अशीच ढोबळ जाणीव ह्या काळाची दिसून येते.हरिभाऊंच्या कालखंडातील कथेमध्ये आटोपशीरपणा, एकसूत्री-पणा, सुसूत्रता, सूचकता इत्यादी कलात्मक अंगे उपेक्षितच राहिलेली दिसतात. कथेमध्ये रंजकतेचे प्रमाण कमीअधिक प्रमाणात जाणवू लागले. तरीही कथेला वास्तवतेचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हरिभाऊंनी आणि त्यांच्या 'करमणूक' ने केले, हे विसरून चालणार नाही. हरिभाऊंच्या कथेनेच पुढील लेखकांना वास्तवतेचे व कल्पनारम्यतेचे सुरेख समन्वय साधलेले रंजक जीवनचित्र

KOLHAPUR

रेखाटण्याची प्रेरणा दिली. हरिभाऊंच्या कथेने मराठी कथावाङ्मयाच्या विकासाच्या वाटचालीला नवे वळण देऊन नवीन दिशा दाखविण्याचे काम केले.

हरिभाऊंच्या ह्याच वास्तवपूर्ण पार्श्वभूमीवर वि. सी. गुर्जरांनी विपुल कथालेखन केले. मध्यमवर्गीय जीवनातील साधे साधे घटनाप्रसंग त्यांनी आपल्या कथेत आणले. त्यांनी अनेक बंगाली कथांची रूपांतरे केली. तपशीलवार वर्णन व पाल्हाळ ह्याला त्यांनी छेद दिला. 'पुरूषाची जात', 'शेवटचे हास्य' ह्या त्यांच्या कथांनी मराठी कथेला लोकप्रियता मिळवून दिली. गुर्जरांचे समकालीन कृ. के. गोखले ह्यांनी काही विनोदी कथा लिहिल्या. ह्यानंतर सरस्वतीकुमार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, शिवराम महादेव परांजपे. आदी कथालेखकांनी मराठी कथा वाचनीय व लोकप्रिय बनवली. तसेच मामा वरेरकर, ना. ह. आपटे, ह्यांनीही अल्पसे कथालेखन केले. वरेरकरांनी 'कलिकेचे अश्रू', 'माडाचा पोर' सारख्या सुंदर वास्तव कथा लिहिल्या. ना. ह. आपट्यांनी कथा बोधवादी बनवली.

एकूणच ह्या कालखंडात कथा रंजक होऊ लागली होती. अद्भुततेच्या कसोटयात अजून ती रमत होतीच. ती वरवरची गुंतागुंत आणि सुखान्त शेवट अशा स्वरूपाची बनली होती. परंतु ह्या कालखंडातील दिवाकर कृष्णांची कथा थोडेसे वेगळे वळण धरून प्रवास करत होती. घटनेपेक्षा मनोविश्लेषणावर तिने अधिक भर दिला व तिचा शेवट शोकान्तात केला. हे त्या कथेला नवीन होते. त्यांनी सुखापेक्षा दुःख कसे चटके लावून जाते, हे दाखवून दिले. 'संकष्टी चतुर्थी', 'मृणालिनीचे लावण्य', 'अंगणातला पोपट' ह्या त्यांच्या उत्कृष्ट करूणामय कथा होत. व्यक्तीच्या बाह्य मनाऐवजी त्यांची कथा अंतर्मनाची भावनात्मक स्पंदने टिपू लागली. मराठी कथावाङ्मयात मनोविश्लेषणात्मक कथेची पायाभरणी त्यांनी केली.

विसाव्या शतकात इंग्रजी लघुकथालेखक सॉमरसेट मॉम ह्यांनी लघुकथालेखनाचा आदर्श दाखवला. म्हणून मोपॉसाँच्या 'नेकलेस' ह्या कथेचा उल्लेख केला आहे. मोपॉसाँनी 'वारस' नावाची कथा एकदा दीर्घकथा म्हणून आणि दुसऱ्यांदा लघुकथा म्हणून अशी दोन वेळा लिहिली. ह्या कथेपासून 'लघुकथा' ह्या स्वतंत्र वाङ्मयप्रकाराचा जन्म झाला, असे म्हटले जाते.

ह्याच काळात मराठी कथावाङ्मयामध्ये 'लघुकथा' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार सापडतो. हरिभाऊ आपटयांच्या 'स्फुट गोष्टी' मधील बहुतेक कथा जरी गोष्टीरूपात असल्या, तरी त्या 'स्फुट गोष्टी' मध्ये लघुकथेची बीजे सापडतात. अर्थात् हरिभाऊंनी जाणीवपूर्वक लघुकथांचा आविष्कार केला, असे म्हणता येत नाही. तरी अपघाताने का होईना, त्यांची कथा लघुकथेला जवळ जाणारी वाटते.

आटोपशीरपणा, पात्रप्रसंगांची मर्यादा, औचित्य, उत्कंठा, रंजकता ह्या बाबींचा त्यांच्या कथेत अभाव असला, तरी कथावाङ्मयाच्या वाटचालीत त्यांनी मोलाची भर घातली आहे.

दिवाकर कृष्णांनी मात्र कथेकडे एक कलाप्रकार म्हणून पाहिले. त्यांनी आपल्या मनोविश्लेषणात्मक कथांमधून तशी जाणीव करून दिली. दिवाकर कृष्णांची कथा जुन्या आणि नव्या कथेतील महत्त्वाचा दुवा ठरली. गंगाधर गाडगीळ म्हणतात, " मनोविश्लेषण हा त्यांच्या कथेचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांनी माणसाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तित्वाचे आपल्या कथांतून मराठी वाचकांना दर्शन घडविले आणि मानवी व्यक्तिमत्वाच्या अजाणतेपणात बुडालेल्या भागाचे चित्रण करून त्याला एक नवे परिमाण दिले."[३]

*४. इ.स. १९२५ ते १९४५ :*

ह्या काळात 'करमणूक' व 'मनोरंजन' ह्या नियतकालिकांप्रमाणेच इतरही नियतकालिकांचा झपाटयाने उदय झाला. त्यामध्ये प्रामुख्याने 'रत्नाकर' (१९२६) व 'यशवंत' (१९२८) ह्या दोन नियतकालिकांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. ह्याचबरोबर ह्या कालखंडात 'ज्योत्सना', 'किर्लोस्कर', 'समीक्षक', 'संजीवनी', 'ध्रुव','प्रतिभा' इ. नियतकालिके बहरात आली होती. ह्या सर्व नियतकालिकांनी इतर वाङ्मयप्रकाराबरोबरच कथावाङ्मयाला प्रकाशित करण्यास मोलाचा हातभार लावालेला दिसतो. ह्या काळाचे महत्त्व म्हणजे कथावाङ्मयप्रकाराला मिळालेली तांत्रिकतेची जोड. कथावाङ्मयाला तांत्रिकतेने जोडण्याचा पहिला प्रयत्न नारायण सीताराम फडके ह्यांचा. फडक्यांनी हे तंत्र पाश्चात्यांच्या कथातंत्रातून उदयास आणले, आधी उल्लेखिलेल्या नियतकालिकांमधून पाश्चात्य कथाकार गॉर्की, चेकॉव्ह, मोपासाँ, ओ हेन्री ह्या कथाकारांच्या कथा प्रकाशित झाल्या. ह्या कथा वाचून मराठी रसिकांना जगप्रसिध्द कथाकारांची ओळख तर झालीच, पण त्याच बरोबरच सूत्रबध्द, तांत्रिक पध्दतीने लिहिलेल्या कथा व त्यातील अनुभवविश्व कसे कलासंपन्न होऊ शकते, ह्याचाही अनुभव घेता आला. ही घटना मराठी कथावाङ्मयाच्या विकासाला कारणीभूत ठरली, ह्यात शंका नाही. पाश्चात्य वाङ्मयाच्या परिशीलनाने मराठी साहित्याची दृष्टी पाश्चात्यांप्रमाणे आशय, विषय व अभिव्यक्ती ह्या सर्व दृष्टीने बदलली. ती व्यापक व विस्तारीत झाली व एखाद्या वाङ्मयप्रकाराला तंत्राची जोड दिली, रचनाकौशल्याची जोड दिली,तर तो वाङ्मयप्रकार कसा कलात्मक उंची गाठू शकतो, ह्याची कल्पना आली. अशा प्रकारे फडके ह्यांनी 'प्रतिभासाधन' हा ग्रंथ लिहून तंत्रवादाला सुरूवात केली.

फडक्यांनी कथेसंबंधी लिहिताना आकर्षक सुरूवात व परिणामकारक शेवट, गाठ - निरगाठ असे रचनातंत्र सुचवून त्यामध्ये उत्कंठावर्धन आणि आश्चर्यकारकता ह्या बाबींचा समावेश अपरिहार्य मानला. ह्या रचना तंत्राला अनुलक्षूनच फडक्यांचे कथालेखन झाले आहे. 'शोभेसाठी' व 'उलटे शांकुतल' इ. त्यांच्या कथा तंत्रबध्द आहेत. धक्कादायतेतूनच त्यांच्या कथा रहस्यकथांना जवळ जाणाऱ्या वाटतात.

पूर्वीच्या कथांमधील पाल्हाळ, पात्रांची गर्दी, दीर्घ आणि रंजक संवाद ह्यांना फडक्यांनी मुरड घातली. परंपरावादी संस्कृतप्रचुर व अतिबालबोध भाषेला त्यांनी बगल दिली. भाषेत सफाईदारपणा आणून तिला अटकर बांधा बहाल केला व तिचे बेढभ रूप बदलून टाकले.

ह्या कालखंडात फडक्यांच्या बरोबर वि.स. खांडेकर हे प्रसिध्द कथालेखक कथालेखनाच्या प्रांतात आपला वेगळा ठसा उमटवत होते. वास्तवाला अद्‌भुततेची जोड देऊन खांडेकरांच्या कथेने मराठी वाचकांना मोहिनी घातली, हे 'बाहुली' व 'गार वारा' ह्या त्यांच्या कथांमधून दिसते. खांडेकर हे जीवनवादी होते. गांधीवादाचा बराचसा प्रभाव त्यांच्या लेखनावर होता. भूतदयावाद हा खांडेकरांच्या कथा लेखनाचा केंद्रबिंदू होता. ते टॉलस्टॉयप्रमाणे जीवनवादी होते. त्यांच्या जीवनवादी दृष्टीमुळे गरीब व श्रीमंत, श्रेष्ठ व कनिष्ठ ह्या दोनच घटकांमधून त्यांचा संघर्ष वावरतो. अतिरंजितता, कृत्रिमता, अलंकारिकतेचा सोस व अद्‌भुतता इ. अवगुण त्यांच्या कथावाङ्‌मयात असूनसुध्दा ते एक लोकप्रिय व श्रेष्ठ कथाकार म्हणून उदयाला आले.

साधारणत: हा कालखंड 'फडके खांडेकर युग ' म्हणून ओळखला जातो. ह्या दोघांच्या कथालेखनाच्या भरभराटीचा हा कालखंड होता. जीवनासाठी कला की कलेसाठी कला ह्याविषयी वाङ्‌मयीन वादही ह्या कालखंडात गाजला. ह्या काळात कला'कलेसाठी कला'म्हणणारे फडके कधीकधी जीवनवादाचा पुरस्कार करत असल्याचे, तर जीवनासाठी कला म्हणणारे खांडेकर कधीकधी कलावादाचा पुरस्कार करत असल्याचे जाणवते. कलावाद आणि जीवनवाद ह्याची भेसळ झाल्यामुळे आणि त्यांच्या अतिरिक्त हव्यासामुळे कथा कृत्रिमतेकडे अधिक झुकू लागली. ह्या काळात कथावाङ्‌मयामध्ये तंत्रवादाचा शिरकाव झाल्याने कथेमध्ये बेगडीप्णा आला. तिला बाह्य रेखीवपणा आला. ह्या काळात कथेत आंतरिक जिव्हाळा कमी झाला. त्यामध्ये कृत्रिमता येऊ लागली.

तंत्राचा फोलफटपणा अनुभवलेले काही लेखक ह्या काळात कथालेखन करीत होते. त्यामध्ये भा.वि. वरेरकर, साने गुरूजी, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे ह्यांचा समावेश होतो. ह्या लेखकांनी भावविवश कथा लिहिल्या. सानेगुरूजींची 'वामन भटाची गाय' ही कथा सुंदर अवतरली

आहे. काणेकरांनी 'दत्ताचे देऊळ', 'काळी मेव्हुणी', 'कुमारिका' इ. मनोवेधक कथा लिहिल्या. प्रभाकर पाध्ये ह्यांच्या 'वेडी आशा', 'पिंपळाचे झाड' ह्या कथांना प्रादेशिकतेचे अंग आहे, तर चोरघडयांनी मराठी कथेला पूर्वसूरींच्या जोखडातून मुक्त करून, चाकोरी बध्दतेच्या बाहेर काढून भावुक मनाचे उत्कृष्ट दर्शन आपल्या कथांमधून घडविले. त्यांनी दिवाकरांच्या कथेतील मनोविश्लेषणाला आपल्या कथेतून विकासगर्भ रूप प्राप्त करून दिले. य. गो. जोशी ह्यांनी तंत्रवादाला विरोध करून तंत्रवादाचे जोखड फेकून दिले 'शेवग्याच्या शेंगा', 'वहिनीच्या बांगडया' व 'दुधावरीची साय' ह्या त्यांच्या कथा खूप लोकप्रिय झाल्या. त्यांनी मानवी मनाचे सखोल दर्शन घडविण्यात यश मिळविले.

ह्या कालखंडातील कथेने अद्भुतरम्यतेला छेद देऊन वास्तवतेची कास पकडलेली दिसते. कथा खऱ्या अर्थाने अस्सल वास्तवतेकडे झुकताना दिसते.

*५. १९४५ ते १९६० :*

ह्या काळात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी अस्सलतेकडे, वास्तवतेकडे, झेपावणाऱ्या मराठी कथेला अधिक सूचक आणि आत्मगर्भ बनविले. ह्या काळात 'सत्यकथा' व 'अभिरूची' ही मासिके व द्वैमासिके ऐन भरात होती. ह्या मासिकांनी ह्या नवकथाकारांना प्रकाशात आणण्याचे कार्य केले. ह्या काळात कथेचा विकासच नव्हे, तर कथेमध्ये क्रांती झालेली दिसून येते. ह्याच दरम्यान दि. बा. मोकाशी, श्री. ज. जोशी, हमीद हलवाई हे नवकथाकार पुढे आले. म. द. हातकणंगलेकरांच्या मते," या कथाकारांनी कथा या वाङ्मयप्रकाराला कलात्मक सामर्थ्य व आत्मा प्राप्त करून दिला. त्याच प्रमाणे नवीन विषय गंभीरतेने हाताळणीच्या धिटाईदेखील मिळवून दिली."[४] ह्या कथाकारांनी कथेला घटनाप्रधानतेच्या व तंत्रबध्दतेच्या जोखडातून मुक्त करून स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिले.

ह्याच काळात कथेने सर्वमान्य, सूचक, सखोल आणि सुक्ष्म रूप धारण केले. अर्थात कथेचा विकास झाला. नवकथेचे वारे वाहू लागले. नवकथेचे आद्यप्रर्वतक गंगाधर गाडगीळ ह्यांची 'तलावातले चांदणे' सारखी कथा मानवी मनाचा आणि मानवी मनातील विसंगतींचा सूक्ष्म आणि सखोल अर्थ शोधू लागली. पु.भा. भाव्यांची 'सतरावे वर्ष', तर माडगूळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' ह्या कथांनी पारंपरिक कथेला आशयसंपन्न व संस्कारशील बनविले. विशेषत: माडगूळकर आणि गाडगीळांच्या कथा जीवन जाणिवा आणि आशयगुणांनी कलासंपन्न झाल्या होत्या. जीवनाशयाचे सच्चे दर्शन घडविणे, हेच त्यांच्या कथेचे उद्दिष्ट होते. त्यामुळे त्यांच्या कथांमधून कमालीचा प्रामाणिकपणा आला त्यातून कथेच्या

LIBRARY KOLHAPUR

कक्षा रूंदावल्या. हे कथाकार अस्सल वास्तव कथेतून मांडण्यासाठी कथेसाठी निरनिराळे घाट योजू लागले.ह्याच काळात कथाविषयही अधिक व्यापक , सुक्ष्म आणि सूचक बनत गेले.

अरविंद गोखले, पु.भा. भावे ह्यांच्याप्रमाणे गाडगीळांच्या कथेतील व्यक्तिचित्रणेही मध्यमवर्गीय आहेत. गोखल्यांच्या कथेत मनोविश्वाची गहनता अधिक आहे. भाव्यांच्या कथेत चटकदार घटनाप्रसंग, दृश्य, मानसिक चमत्कृती आणि वैगुव्य, संघर्ष, मानवी आणि नैसर्गिक भावविश्व आणि एकूणच मानवी जीवनातील सूक्ष्मता अधिक आहे. तीच गोष्ट गाडगीळांबाबत म्हणून ह्या काळातील कथांना जीवनाचा खोल अर्थ प्राप्त झालेला दिसून येतो.

६. *१९६० नंतरची कथा :*

ह्या कालखंडात मुख्यत्वे दिलीप चित्रे, चिं.त्र्यं. खानोलकर, कमल देसाई, विद्याधर पुंडलीक, शरदचंद्र चिरमुले, श्री. दा. पानवलकर, विजया राजाध्यक्ष, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, आनंद जातेगावकर, ए.वि.जोशी, बाबूराव बागूल, सुधा नरवणे, अनिल डांगे ही आणि अशी कितीतरी कथालेखकांची पिढी पुढे आली आणि मराठी कथा अधिकाधिक आत्मगर्भ आणि समृध्द करू लागली. आधुनिक साहित्यातील समृध्द वाटा व नवी वळणे ह्या कथाकारांनी मराठी कथेला मिळवून दिल्या व प्रत्येक लेखक स्वत:चा असा स्वत:पुरता नवा मनसुभा तयार करून यशस्वीपणे वाटचाल करू लागला. त्याची ही वाटचाल आत्यांतिक आत्मविश्वासाची असल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे मराठी कथावाङ्मयाची वाटचाल सारांशरूपाने प्राथमिक अवस्थेपासून ते आजतागायतपर्यंत मांडण्याचा येथे आपण प्रयत्न केला.

## १.३. मराठी कथावाङ्मयाच्या वाटचालीतील ग्रामीण कथाकारांचे योगदान :

मराठी कथावाङ्मयाची वाटचाल आणि तिच्यातील ग्रामीण कथाकरांचे योगदान जाणून घेत असताना प्रथम: प्रस्तुत प्रकरणाच्या पूर्वार्धात मराठी कथेचा प्रवास पाहिला. येथे ह्या प्रकरणातील ग्रामीण कथाकारांचे योगदान असे लक्षात घ्यावयाचे आहे. ह्यासाठी प्रथम: ग्रामीण कथालेखकांच्या कथालेखनाचे स्वरूप व वैशिष्टये लक्षात घेणे आवश्यक आहे म्हणजे ग्रामीण कथेची वाटचाल व तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान सहजासहजी लक्षात येईल.

*हरिभाऊ आपटे:*

आज आपल्याला ग्रामीण जीवनाचे अनेकांगी दर्शन घडविणारी जी ग्रामीण कथा दिसते, तिच्या उगमाकडे जाताना हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या कथेपाशी येऊन थांबावे लागते.[५] इ.स. १८९७ मध्ये महाराष्ट्रामध्ये जो भयानक दुष्काळ पडला, त्याची वृत्ते 'डेक्कन सभेच्या' कागदपत्रांमध्ये हरिभाऊंना वाचायला मिळाली. त्यावरच 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा त्यांनी लिहिली. ग्रामीण जीवनाचा अनुभव नसताना त्यांनी दुष्काळी शेतकऱ्यांच्या परिस्थितीला अनुलक्षून ही कथा लिहिली. त्यात त्यांनी शेतकरी जीवनाची दुदर्शा रंगवली. ''शेतकरी जीवनाची सगळीच वाताहत एकाच कथेत आणावयाची इच्छा धरल्याने असंभव्यतेला ही कथा मध्यानंतर स्पर्श करीत पुढे सरकते, अद्‌भुताला सामोरी जाते'', हे आनंद यादवांचे म्हणणे योग्य वाटते.[६] ग्रामीण जीवनाचा अनुभव नसला, तरी मराठी साहित्यात कथेच्या रूपाने शेतकऱ्यांचे जीवनदर्शन घडविण्याची कामगिरी हरिभाऊंनी पार पाडली. ह्या कथेतील दुष्काळाची माहिती सामर्थ्यवान आहे. तरीही ही स्फुट गोष्ट हा एक वाङ्मयीन अपघात वाटतो. ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा घेऊन ती जन्माला आली नाही. केवळ आजच्या ग्रामीण कथावाङ्मयाची ती एक जन्मखूण दिसते.[७]

हरिभाऊंच्या इ.स.१८९० मध्ये अस्तित्वात आलेल्या 'करमणूक' ह्या साप्ताहिकातून 'स्फुट गोष्टी' चा जन्म झाला. अद्‌भुतरम्यतेच्या, उपदेशाच्या चौकटीतून कथा बाहेर पडून ती वास्तववादी बनली. ह्या काळात हरिभाऊंनी दीर्घ कथा, ऐतिहासिक कथा व विनोदी कथा इ. प्रकारची कथा लिहिली. कथेला व्यक्तिगत, सामाजिक आशयातून नवनवे धुमारे फुटू लागले. ग्रामीण जीवनातील अनुभूतींना ललित वाङ्मयात प्रथम स्थान मिळाले ते हरिभाऊंच्या काळात.

मराठी कथेने इ.स.१९१० नंतर वेगळेच वळण घेतले. इ.स.१९१७ ला हरिभाऊंचे 'करमणूक' हे साप्ताहिक बंद पडले. वि. सी. गुर्जर, कृ .के.गोखले, ना.ह.आपटे, वा.म.जोशी इत्यादींनी मध्यमवर्गीय पांढरपेशे जीवन कथेतून रंगविले. इ.स.१९२५ ला मराठी कथा पुन्हा बदलली. घटनाप्रधानता संपून व्यक्तिप्रधान होऊन, व्यक्तीच्या अंतरंगात शिरून ती भावभावनांचे रंग रंगवू लागली. तिला 'लघुकथा' हे नाव रूढ झाले. त्यात दिवाकर कृष्ण केळकरांचा मोठा वाटा आहे. दिवाकर कृष्णांनी कथांमधून नाजुक भावभावनांची पखरण व कलात्मकता ह्यांचा संगम साधला. त्यांच्या हळव्या व भावविवश नायिका मनाला चुटपुट लावतात.

### *वि.स. सुखठणकर व लक्ष्मणराव सरदेसाई :*

ग्रामीण जीवनाविषयीच्या जाणिवा मराठी साहित्यात प्रथम वि.स.सुखठणकरांनी निर्माण केल्या. खेडयातील जीवनदर्शन घडविताना त्यांनी कथेचा उपयोग प्रबोधनासाठी केला. १९३१ साली 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आठ प्रादेशिक कथांचा संग्रह त्यांनी प्रसिध्द केला 'आजचे व कालचे गोमंतक' असेही अजून एक नाव ह्या कथासंग्रहाचे आहे. गोव्यातील जीवन, देवदासींची अमानुष पध्दत, शेजारीपाजारी गावे, तेथील हाडवैर, गावातील वतनदार आणि शेतकरी ह्यांच्यातील कुरकूर, गरीब आणि श्रीमंत ह्यांच्यातील भांडणे, अंधश्रध्देमुळे निर्माण झालेले ख्रिस्ती आणि हिंदू ह्यांच्यातील ताणतणाव, आंधळा अभिमान, लाचारीला चटावलेली देशी मनोवृत्ती अशा अनेक प्रवृत्तींवर सुखठणकरांच्या कथेने प्रकाश टाकला. त्यामागील त्यांची प्रेरणा साम्यवादी, गांधीवादी व देशप्रेमाची होती. कधी आदर्शाच्या आत्यंतिक टोकाचे चित्रण त्यांची कथा करते. समाजदर्शनापेक्षाही समाज-प्रबोधन हेच सुखठणकरांना अभिप्रेत होते, असे दिसून येते. डॉ वासुदेव मुलाटे म्हणतात, ''यांच्या सह्याद्रीच्या ... या कथासंग्रहपासून मराठी ग्रामीण कथेची सुरुवात समजण्यास हरकत नाही.''[८]

गोमंतकाशी निगडीत असलेले कथालेखन तेवढयाच आत्मीयतेने लक्ष्मणराव सरदेसाई ह्यांनी केले. १९४० साली त्यांचा 'ढासळलेले बुरूज' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यांच्या प्रेरणाही जवळपास वि.स.सुखठणकरांच्या जवळपासच्याच होत्या. पण 'मोडलेला माड', 'जरीचे पातळ', 'गुरवाचे रक्त' इ. कथांमधून त्यांनी काहीसे आपले वेगळेपण जपले. ह्यात जीवनातील नाटय, मानवी स्वभावाचे नमुने, स्त्री -पुरूष संबंध ह्यासारखी वैशिष्टये निर्माण झाली.

### *श्री. म. माटे :*

'उपेक्षितांचे अंतरंग' आणि 'माणुसकीचा गहिवर' अशा कथासंग्रहांमधून माटयांनी रानावनात वावरणारी, फरफटत जीवन जगणारी माणसे उभी केली. मानवी जीवनातील उपेक्षित स्तर त्यांना दिसला व समाजातील उपेक्षित जीवन कसे अस्थिर आणि करूणाजनक आहे, ह्याचा प्रत्यय माटयांनी कथांमधून आणून दिला. नुसती वरून सहानुभूती दाखविण्यासाठी ते जीवनाकडे वळले नाहीत, तर ह्या स्थरातील दलितांची, उपेक्षितांची, दीनदुबळयांची निरपेक्ष सेवा घडावी, ह्या माणुसकीच्या भावनेने ते ह्या प्रांताकडे वळले. माटे ह्यांचा पिंड समाजसुधारकाचा आणि विचारवंताचा होता. असे असले तरी, कथा-लेखनातून प्रचार व प्रसार साधावा, हे त्यांना मान्य नाही. त्यांना जी माणसे दिसली, तीच त्यांनी आपल्या कथांमधून अभिव्यक्त केली. दरोडेखोर पण प्रामाणिक पिऱ्या, मुक्याने मेलेली सावित्री,

पिकासाठी टाहो फोडणारा भिवा, गंगाराम, सगाजी, बहिरनाक, रामभरोशी, नाथनाक आणि देवकाई आणि अनाथ बन्सीधर इ. व्यक्तिरेखा त्यांच्या व्यक्तिमत्त्वासह त्यांनी आपल्या कथेत आणल्या.

माटयांना ही माणसे चोऱ्या, दरोडे का घालतात, ह्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण द्यावेसे वाटत नाही. कारण हीसुध्दा माणसेच आहेत. ती अशिक्षित, रांगडी, मायाळू आणि श्रध्दावान आहेत. माटयांचा अनाथ बन्सीधर, काहीच न बोलणारी सावित्री व पिऱ्या ही माणसे जिवंत होऊनच आपल्यासमोर उभी राहतात. त्यांच्या मनातील गुंतागुंत आपल्याला जाणवू लागते. माटयांची ही माणसे खऱ्या अर्थाने मराठमोळी वाटतात. त्यांची कथा वास्तवाच्या प्रखर अधिष्ठानावर उभी आहे. माटे कुठेही स्वप्नरंजनाच्या आहारी जात नाहीत. ते थेट ग्रामीण वास्तवाच्या गाभ्याला भिडतात. ठोकळ, दिघे ह्यांना ग्रामीण जीवनातील दु:ख आणि दारिद्रय प्रकट करता आले नव्हते. इतक्या समरसतेने ते माटयांनी प्रकट केले. 'ग्रामीण कथेचे हरिभाऊ' असा त्यांचा गौरव करून आनंद यादव ग्रामीण कथेचे जनकत्व त्यांना बहाल करतात.[९]

*ग. ल. ठोकळ :*

ग्रामीण जीवनाचा अनुभव असूनही ठोकळांची कथा काव्यमय झाली. गावातील नानाविध विषय त्यांनी हाताळले. तेथील अज्ञान, आडदांडगेपणा, खेड्यातील रांगडेपणा, सण, उत्सव, रीतिरिवाज,गावगुंडी, सुगीचे मोहक दिवस, गावागावातील भानगडी आणि भटक्या जाती - जमाती ह्यांचे चित्रण त्यांनी केले. आशयाच्या आणि विस्ताराच्या दृष्टीने खूप नवेनवे विषय ठोकळांनी ग्रामीण कथेला दिले. मनोरंजनाच्या दृष्टीने त्यांची कथा प्रभावी झाली असली, तरी ग्रामीण संवेदनक्षमतेच्या दृष्टीने ती फिकी वाटते. त्यांची कथा पुढे रोमँटिक होत गेली. म्हणून आनंद यादव म्हणतात, " या सर्वांच्या आराधनेत वास्तवातील ग्रामीणपण हरवून तिचा फक्त ग्रामीणाचे काहीही ज्ञान नसलेल्या मध्यमवर्गीय वाचकासाठी आभास ठरला."[१०] तसेच सामाजिकतेच्या अंगाने जीवनदर्शन घडविण्याचा विचार ठोकळांच्या कथेने केलेला दिसत नाही.

*र. वा. दिघे :*

कोकणाच्या पार्श्वभूमीवरील माणसाचे जीवनचित्रण र. वा. दिघे ह्यांनी चित्रित केले. परंतू काव्यमय वर्णनाच्या बेहोशीत त्यांच्या कथेतील जिवंत माणूस हरवून गेला. मात्र ठोकळांपेक्षा व्यापक कथा लिहून कथेला त्यांनी अधिक काव्यात्मक बनवले. कल्पनारम्यता आणि अद्‌भुतता ह्याचे मिश्रण त्यांच्या कथेत दिसते. कोकणी प्रदेश, त्यातील खेडयातील संभाव्य सुधारणा हे सर्व दाखविण्याचा ओढा

अधिक दिसतो. जीवनाच्या गांभीर्यापेक्षा सर्वसामान्यातेकडे त्यांचा कल अधिक दिसतो. सामाजिक वास्तवाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांची कथा काव्यात्मकतेत व अद्‌भुतात रमते.

***म. भा. भोसले :***

भोसल्यांनी ग्रामीण कथा सातत्याने व निष्ठेने लिहिल्या. तरी त्यात भरीवपणा व भारदस्तपणा आलेला नाही. संघर्षासारखा ग्रामीण जीवनातील एखादा घटक मात्र ते सहजपणे रंगवतात. हा संघर्ष तितकासा भारदस्त नसल्याने त्यांची कथा एकसुरी होत गेली. परिणामत: त्यांच्या कथेत ग्रामीण जीवनाचा गाभा आलेला दिसत नाही. ह्याच दरम्यान वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे ह्यांनीही दर्जेदार कथालेखन केले. ना. सी. फडके ह्यांनी कथेची निरगाठ, गुंतागुत व उकल अशी काही वैशिष्ट्ये सांगितली. लालित्यपूर्ण भाषेतील, पण वास्तवापासून दूर असलेली मराठी कथा फडक्यांनी लिहिली. 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला', असे वादही ह्याच काळात गाजले. वि. स. खांडेकर जीवनवादी लेखक म्हणून पुढे आले. य. गो. जोशी, वि. वा. बोकील, द. र. कवठेकर इत्यादींनी पांढरपेशा समाजाचे चित्रण आपल्या कथांमधून केले. बी. रघुनाथ ह्यांच्या कथा व्यथांनी भारावलेल्या आहेत. त्यांच्या कथांमधून कोंडलेल्या व दडपलेल्या मनाचे चित्रण येते.

सामान्यपणे ह्या ठिकाणी हे लक्षात घ्यावे लागते की, इ.स. १९२० आणि १९३० ह्या दशकादरम्यान नवनवीन भू - प्रदेश, नवनवीन समाज आणि संस्कृती, सांस्कृतिक जीवन ह्यांची ओळख करून देण्यासाठी लिहिली जाणारी ग्रामीण कथा १९४५ च्या जवळपास काहीशी अंतर्मुख बनली. ग्रामीण परिसर, निसर्ग, तेथील भांडणे व त्यातून व्यक्त होणारे रांगडेपण, प्रणयप्रकरणे ह्याचे चित्रण करून रंजन करणारी, अद्‌भुतता, कल्पनारम्यता ह्यात रंगणारी ग्रामीण कथा मानवी मनाचा वेध घेऊ लागली. येथेच ग्रामीण कथेच्या विकासाचा पहिला टप्पा पूर्ण होतो.

मराठी ग्रामीण कथेच्या विकासाचा दुसरा टप्पा अभ्यासताना 'नवकथा' ही संकल्पना समोर येते. इ.स. १९४० च्या आसपास मराठी कथेच्या प्रवाहाला साचलेपणा आला होता. तो १९४५ साली गतिमान बनला तो नवकथेमुळेच. नवकथेमुळे ग्रामीण कथा अनुभवगर्भ व अंतर्मुख बनून ती व्यक्तिचित्रण व समाजचित्रणाचा गाभा शोधू लागली. महायुध्दाने उध्दवस्त झालेल्या मनाचे, जीवनाचे, त्याच्यातील नव्या जाणिवांचे, आतल्या आत गुदमरलेल्या माणसाचे जीवन प्रतिबिंब नवकथाकार गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले व पु. भा. भावे ह्यांच्या कथेत प्रकर्षाने जाणवते; तर ग्रामीण विश्वातून व्यंकटेश माडगूळकर त्यांना येऊन मिळाले. नागर कथेला वरील बिनीच्या कथाकारांनी

नवे बाळसे आणून तिचा विकास साधला. तेच नेमके कार्य व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण साहित्यात करून दाखविले.[११]

अशा ह्या वैशिष्टयपूर्ण नवकथेच्या आगमनाबरोबर स्वप्नरंजनात आणि बोधात रमलेली ग्रामीण कथाही भानावर आली आणि मराठी कथेच्या अनुभव कक्षा विस्तारत ती नवकथेच्या प्रवाहात सामील झाली. तिच्यातील विषयवैचित्र्याचा हव्यास जसा गेला, तसे शहरी वाचकांचे कुतुहल शमविण्याची प्रेरणाही गेली. मराठी ग्रामीण कथेतील कल्पनारम्यता, अद्भुतरम्यता इ. अनेकविध बाबी गळून पडल्या आणि मराठी ग्रामीण कथाकार वास्तवाचा वेध घेऊ लागले. " ग्रामीण जीवनाविषयीच्या खुळया समजुती या लेखकांनी बदलून टाकल्या (१९४५ नंतरच्या) या लेखकांनी जगलो वाढलो तो परिसर, तिथल्या माणसाचं भावविश्व, तिथल्या निसर्गाची विविध रूपे चित्रित केली", हे डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे विधान ह्या काळखंडाला सर्वार्थाने लागू पडते.[१२]

*व्यंकटेश माडगूळकर :*

ग्रामीण कथेला आशयाच्या व अभिव्यक्तीच्या अंगाने समृध्द करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरांनी पहिल्यांदाच केले. त्यांच्या अनुभवाचा प्रदेश 'माणदेश' हा आहे. माणदेशाच्या दुष्काळी मातीत धडपडणारी, जीवन जगणारी, दरिद्री, धाडसी, वेडी - विद्री, दुःखी, सहनशील, बेरकी, नाठाळ, खुळी, भोळी, कावेबाज, हरहुन्नरी, खुनशी, मायाळू व मातीवर प्रेम करणारी अशी नानाविध प्रकारची माणसे त्यांना दिसली. त्यांचा ग्रामीण जीवनाचा अनुभव आणि दैवदत्त कलात्मक जाणीव ह्यामुळे त्यांच्या कथा खऱ्या माणसांच्या जिवंत कथा ठरल्या आहेत. विजया राजाध्यक्ष त्यांच्या कथेविषयी लिहितात, "व्यंकटेश माडगूळकर हे 'ग्रामीण' कथेचे जनक, त्यांनीच ती निर्माण केली आणि समृध्द केली त्यांची परंपरा राखणारी आणखी काही कथाकार मंडळी त्यांच्यानंतर निर्माण झाली, हे ग्रामीण कथेचे भाग्य."[१३] 'माणदेशी माणसं', 'गावाकडच्या गोष्टी', 'हस्ताचा पाऊस', 'उंबरठा' ह्या त्यांच्या कथासंग्रहांमधून त्यांनी रखरखता माणदेश उभा केला.

ग्रामीण माणसाच्या स्वभावातून निर्माण होणाऱ्या घटना, गोष्टी, गमती, गावातील हेवेदावे, चुरस, भानगडी, गाव, म्हारवाडा, परस्परसंबंध, शेती, पिके, त्यातून निर्माण होणारे संघर्ष हे सर्व त्यांनी कथेतून आणले. प्रा. म. द. हातकणंगलेकर त्यांच्या विषयी लिहितात, " एखाद्या सर्वसामान्य घराण्यात अवतारी मूल जन्मावे, तसा ग्रामीण कथेच्या वंशात माडगूळकांचा जन्म आहे. ग्रामीण जीवनाच्या बारीक-मोठया रक्तवाहिन्यातून त्यांचे सहृदय कलापूर्ण शहाणपण अदृश्यपणे वावरत असते."[१४]

माडगूळकरांच्या अनुभवाचा विस्तार, व्याप तोच असला ; तरी अनुभवाचा कस, त्याची खोली, सूक्ष्मता, तरलता, त्यातील गहनता त्यांनी पकडली व आजपर्यंत कमीअधिक विस्तारलेली ग्रामीण कथा माडकूळकरांनी विकसित केली, तिला वेगळे परिमाण दिले. त्यामुळे कथेला वेगळे तेज चढले. प्रा. म. ना. अदवंत म्हणतात, ''माडगूळकर यांची कथा माणदेशाच्या अस्सल, कसदार मातीतून निर्माण झाली. म्हणून तिच्यातील जिवंतपणा आपल्याला जाणवतो. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तींचे दारिद्र, त्यांचा भोळेपणा, त्यांची कणखर वृत्ती, त्यांचा अडाणीपणा व विकारसुलभता ह्या सर्वांचे दर्शन त्यांच्याच भाषेतून घडविल्लात. ग्रामीण कथेला अद्‌भुततेच्या आणि कल्पनारम्यतेच्या कोंडीतून सोडवून, वास्तव ग्रामीण कथेचा आदर्श त्यांनी निर्माण केला.''[१५]

ह्या काळात नवसाहित्य अधिक प्रगल्भतेने निर्माण होऊन वाङ्मयीन कलात्मकतेला बाळसे चढू लागले. त्याची प्रेरणा शुध्द कलेची होती. माडगूळकरांच्या कथांचा विशेष नोंदविताना गो. मा. पवार म्हणतात, '' महार, मांग, चांभार, व्हलार, रामोशी, धनगर, तसेच वडार, गोसावी, वैदू, सोनार, नंदीवाले ह्या भटक्या जमातीतील व्यक्ती ह्या त्यांच्या चित्रणाचा विषय बनलेल्या आहेत.''[१६] ह्या व्यक्ती केवळ काही जातींच्या म्हणून आल्या नाहीत, तर त्या त्या जातीची काही एक वैशिष्टये घेऊन त्या प्रत्ययाला येतात.

माणदेशाच्या कथा वाचत असताना आपण त्या कथेतील व्यक्तिरेखांबरोबरच चालत असल्याचा भास होत राहतो. 'बाजारची वाट' सारखी कथा वाचल्यानंतर ह्या कथेत ग्रामीण वास्तवता आणि सूक्ष्म नाटय एकत्र आल्याचे जाणवते. माडगूळकरांनी श्रध्दा, संकेत, रूढी, परंपरा ह्यांना चिकटून राहणारा ग्रामीण समाज फार समजूतदारपणे उभा केला. म. द. हातकणंगलेकरांनी म्हटल्याप्रमाणे, '' त्यांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले.''[१७] माडगूळकरांच्या पूर्वीच्या कथेतील कृत्रिमता आणि अद्‌भुतता ह्यांना वर्ज्य करण्याचे काम ह्या कथेने केले आणि ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसविले. इंदुमती शेवडे त्यांच्या कथेविषयी म्हणतात, ''व्यंकटेश माडगूळकरांची कथा म्हणजे नवकथेच्या आणखी एका वेगळया जातीचा फुलोरा.''[१८] माडगूळकरांनी कथेला अनुभवाकडे अत्यंत संयमाने पहावयाला शिकविले. तिला वास्तववादी बनवले. समाजातील विविध अंगाकडे पाहून त्यांनी त्यांचे वास्तव चित्रिण केले. थोडक्यात, पुढच्या ग्रामीण कथाकारांना दिशा देणारे माडगूळकर हे एक दीपस्तंभ ठरले आहेत.

*शंकर पाटील :*

शंकर पाटील हे माडगूळकरांनंतर नव्या दमाचे व वेगळया ताकदीचे ग्रामीण कथाकार पुढे आले. सुरूवातीला त्यांनी व्यंकटेश माडगूळकरांच्या पावलावर पाऊल टाकून कथा लेखनाला प्रारंभ केला. परंतु अनुकरणातून त्यांची कथा लवकरच मुक्त झाली आणि माणसाच्या अंतर्मताचा ती शोध घेऊ लागली. त्यांच्या मनोविश्लेषणात्मक कथा 'वळीव', 'भेटीगाठी' व 'ऊन' ह्या कथासंग्रहांतून वाचायला मिळतात. त्यांनी प्रामुख्याने स्त्रियांच्या जीवनाचा कोंडमारा मनोविश्लेषणाच्या अंगाने चित्रित केला. मनाची गुंतागुंत, त्याची आंदोलने, अनेकविध पापुद्रे त्यांनी उलगडून दाखविले. त्यामुळे कथा अधिक आविष्कारशील बनली.

'आभाळ', 'वेणा', 'भार' ह्यासारख्या कथांमधून त्यांनी स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण केले. त्यांच्या बहुतेक गंभीर कथा स्त्रियांच्या दु:खातून जन्मतात ह्या संदर्भात हातकणंगलेकर आपले निरीक्षण पुढीलप्रमाणे मांडतात, ''शंकर पाटलांच्या बहुतेक गंभीर कथा स्त्रियाच्या दु:खासंबंधी आहेत.त्यांच्यात सोसणे कमी व आकांत अधिक आहे, तर माडगूळकरांच्या कथांतील संयमात व गहिरेपणातही भिन्नता निर्माण झाली आहे. पाटलांच्या कथेला आविष्कारपध्दतीत व भाषाशैलीत काही नवी वैशिष्टये मात्र आली. स्वत:च्या दु:खाची कर्मकहाणी स्वत:शीच आवळल्यासारखी, गाऱ्हाणे झुलत झुलत मांडल्यासारखी निवेदनाची शैली तयार झाली.''[११]

खेडयातील जीवनापेक्षा खेडयातील माणसांच्या मनाचा विचार शंकर पाटील ह्यांनी अधिक केला. मराटी ग्रामीण कथेला हेही नवीनच होते. त्यांनी ग्रामीण जीवनातील कृषिसंस्कृतीशी संबंधित असलेल्या रूढी, प्रथा, परंपरा, चालीरीती, आचारविचार, सणसमारंभ हे 'वळीव', 'धिंड', 'पात', 'सारवण' इत्यादी कथासंग्रहांमधून चित्रित केले. सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करता, त्यांनी समाजापेक्षाही व्यक्ती आणि तिच्या मनाचा गुंता हाच अधिक्याने व्यक्त केला.

*द. मा. मिरासदार :*

ग्रामीण विनोदी कथा सर्वप्रथम द. मा. मिरासदार ह्यांनी लिहिली. जीवनातील विसंगतीवर मिरासदारांनी विनोदी कथा लिहिली व मराठी ग्रामीण कथेला एक वेगळीच दिशा दाखवली. त्यांच्या कथेतील विनोद हा व्यक्ती, तिचा स्वभाव व प्रसंग ह्यांच्यावर आधारलेला आहे. त्यामुळे त्यांच्या विषयनिवडीवर काही मर्यादा पडतात. बढाईखोर, भित्रट, भोळसट, इरसाल कावेबाज, धूर्त, विक्षिप्त, एखादा गुण किंवा दोष असणारी वल्ली माणसे त्यांना जबरदस्त गप्पागोष्टीच्या वेडातून मिळाली व त्या अनुषंगानेच त्यांनी प्रसंगनिर्मिती केली. भुते, प्रेते, चोऱ्या, गुन्हे, फसवणूक, व्यसने, साक्षी इत्यादी रंजक

विषय त्यांनी निवडले व कथेच्या मुळातील मिष्किलपणा उघडकीला आणला व विनोदाला पंख फोडले. त्यांचा निवेदक विसंगतीवरच बोट ठेवत पुढे पुढे सरकतो व कथा अधिक मिष्किल बनवतो. वडिलांच्या वकिली व्यवसायामुळे त्यांना खेडेगावची नमुनेदार माणसे शोधावी लागली नाहीत. उलट तीच मंडळी त्यांच्याकडे चालून येऊ लागली. अर्थात् ह्याला मिरासदारांचा स्वभावही कारण ठरतो. वा. ल. कुळकर्णी त्यांच्या कथेविषयी म्हणतात, ''मिरासदार माणसामध्ये माणूस म्हणून रंगलेले आहेत. त्यांना रस आहे तो माणसात, त्याच्या विविध आचारविचारात आणि व्यवहारात. मग तो माणूस खेडयातला असो किंवा शहरातला. पण त्याहीपेक्षा अधिक रस माणसामध्ये दिसत असलेल्या वेगळेपणात आहे.''[२०] येथे मराठी ग्रामीण कथावाङ्मयाच्या विकासाचा दुसरा टप्पा पूर्ण होतो.

मराठी ग्रामीण कथेच्या विकासाच्या वाटचालीच्या तिसऱ्या टप्प्यातील बहुतांश कथाकारांनी प्रामुख्याने आपण आणि आपल्या आसपासचा परिसर चित्रित करण्याची नवी वाटरूढ केली. ह्या काळात कोकण, सांगली, सातारा, कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी भागांमधील अनेक ग्रामीण कथाकार लेखन करू लागले. ह्यामध्ये उध्दव शेळके, रणजित देसाई, ग.दि. माडगूळकर, सरोजिनी बाबर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, हमीद दलवाई, बाबा पाटील, मुध मंगेश कर्णिक, रा. रं. बोराडे, बा.भ. पाटील, आनंद यादव, महादेव मोरे, बजरंग शेलार, सखा कलाल, चारूता सागर, द.ता. भोसले, चंद्रकुमार नलगे व भास्कर चंदनशिव हे आणि असे कितीतरी लेखक लिहिते झाले व मराठी कथा समृध्द होऊ लागली. १९६० नंतरच्या बहुतेक कथाकारांनी जीवनाबद्दल मूलभूत प्रश्न चित्रित करण्यास सुरूवात केली.

*उध्दव शेळके :*

विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण शेळके ह्यांनी केले. तेथील अत्यंत दरिद्री अवस्थेत राहणारी, वेदनामय जीवन कंठणारी, असाहाय्यता, दैवाधीनता, दारिद्रय भोगण्याची मुकी प्रवृत्ती, शिक्षणापासून दूर असलेली व परंपरेने पदरात टाकलेली दु:खे वागवणारी, कमालीची शोशिक असणारी माणसे त्यांच्याच बोलीत आपली दु:खे सांगताना दिसतात. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''कोणत्याही विशिष्ट विचारसरणीचा चष्मा न घालता शेळके ह्यानी उपेक्षित,पीडित व दरिद्री माणसाच्या व्यथांना वाणी दिली.''[२१]

*रणजित देसाई :*

घटनाप्रधानता, नाटयात्मकता, योगायोग व अुनभव प्रधानता ह्या घटकांना प्राधान्याने कथेतून चित्रित करणारे कथाकार म्हणून रणजित देसाई ह्यांच्याकडे पाहिले जाते. 'रूपमहल' ते 'कातळ' असा

त्यांचा कथालेखनाचा प्रवास आहे. 'रूपमहल' मधील कथा घटनाप्रधान आणि मृत्यूत शेवट करणारी काहीशी स्थूल वाटते. असे असले, तरी ती नाटयात्मकतेकडे अधिक लक्ष देते व तिच्यातून भरपूर योगायोग दिसतो; तर 'कातळ' मधील कथा अधिक सकस व सरस वाटतात.[२२]

*अण्णाभाऊ साठे :*

दीनदलितांच्या दु:खाचे व्यापक व अनुभवगर्भ लेखन सर्वात प्रथम अण्णाभाऊसाठे ह्यांनी केले. व्यापक आणि विपुल अनुभवाद्वारे वारणा खोऱ्यापासून ते मुंबईच्या झोपडपट्टीपर्यंतचे गलिच्छ वस्तीतील जीवन, तेथील माणसे, त्यांचे आचारविचार, श्रध्दा - अंधश्रध्दा, समज - अपसमज, त्यांचे जीवन त्यांच्या सर्व लवाजम्यासह त्यांनी मराठी कथावाङ्मयात आणले. तसे पाहता हे ग्रामीण कथेला नवीन होते. 'बरबाद्या कंजारी', 'खुळवाडी' हे त्यांचे कथासंग्रह त्यांना खूप प्रसिध्दीकडे घेऊन जाणारे ठरले. त्यांच्या लेखनावर गांधीवादाचाही प्रभाव दिसतो.

आपल्या जातीजमातीविषयी लक्षात राहण्याइतपत लेखन त्यांनी केले. त्यांनी उपेक्षितांच्या जीवनावर मोठया ताकदीने कथा लिहिल्या. त्यांच्या कथांमधून दलित जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या, संघर्षप्रधान, आत्मकथात्मक, गुन्हेगारी, बंडखोर जीवनाचे, कौटुबिक ताण-तणाव सहन करणाऱ्या, अन्यायाविरूध्द बंड पुकारणाऱ्या, तसेच खून, मारामारी दरोडे अशी कृत्ये करणाऱ्या व्यक्तिरेखा भेटतात. त्यांच्या कथांवरून त्यांना अद्‌भुततेची आवड असलेले दिसते. ते स्वत: आपल्या लेखनाबद्दल लिहितात, ''मी जे जीवन पाहिले, अनुभवले, सोसले; तेच मी लिहित गेलो.''[२३]

*शंकरराव खरात :*

उपेक्षितांच्या जीवनावर मोठया ताकदीने व जाणीवपूर्वक व कथालेखन माटयांच्यानंतर खरातांएवढे कोणी करू शकले नाही. त्यांनी सर्व कथालेखन प्रातिनिधिक स्वरुपाचे केले, हे 'सांगावा' ह्या त्यांच्या कथासंग्रहावरून दिसते व त्यांच्या अनुभवाचा विस्तार जाणवतो. त्यांच्या व्यक्तिरेखा मुकाटपणे अन्याय सहन करणाऱ्या, अन्यायाच्या खाईत शांतपणे उभे राहणाऱ्या वाटतात. 'दौंडी', 'बारा बलुतेदार', 'तडीपार' ह्या त्यांच्या कथासंग्रहांमधून हे दिसते. त्यांच्या सर्व कथा जीवनाच्या सहानुभूतीतून साकारतात. काही कथांमधून त्यांनी देवदासींच्या जीवनाचेही चित्रण केले आहे.

हमीद दलवाई व मुध मंगेश कर्णिक हे साठे व खरात ह्यांचे समकालीन होत. त्यांनी प्रामुख्याने कोकणाचा परिसर रंगवला. खेडयापाडयातील संघर्ष, त्यातील हिंदू-मुस्लीम संघर्ष ह्या विषयावरील दलवाई ह्यांचे लेखन उल्लेखनीय आहे. हिंदू-मुस्लिमांच्या भावभावनांचे तटस्थपणे व कलात्मकतेने रेखाटन त्यांच्या 'लाट' मध्ये दिसते. कर्णिक विस्तारशील वाटतात. कलात्मतेची जाणीव ठेवून त्यांनी

लेखन केले. त्यामुळे त्यांची कथा तरबेज वाटते. त्यांनी सर्व कथा आकर्षक शैलीत पेश केल्या, हे 'कोकणी गss वस्ती' वरून दिसते.

*रा. रं. बोराडे :*

१९६० नंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाचे ग्रामीण कथाकार रा. रं. बोराडे हे मराठवाडयातील ग्रामीण जीवनाचे अस्सल कलात्मकतेने चित्रण करणारे बी. रघुनाथांनंतरचे एकमेव कथाकार होत. आरंभी त्यांना माडगूळकर, मिरासदार व पाटील ह्यांच्या कथांनी आकृष्ट केले. परंतु लवकरच त्यांची कथा अनुकरणमुक्त होऊन वेगळे बाळसे धारण करीत गेली. ती स्वत:चा असा वेगळा कलापूर्ण घाट शोधताना दिसते. त्यातून त्यांच्या निवेदनाला एक नवे, वेगळे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. मराठमोळया घरघराण्याचे चित्रण करणाऱ्या कुटुंबकथा लिहून त्याद्वारे सामाजिक व कौटुंबिक नातेसंबंधांवर त्यांनी प्रकाश टाकला. मराठवाडी माती व नात्याचे अस्सलपण शोधणारी त्यांची संवेदनशीलता लक्षात घेण्याजोगी आहे. ग्रामीण जीवन, तेथील शेतकरी, त्याची आजची अवस्था हा त्यांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. बदलत्या ग्रामवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांची कथा करताना दिसते.

ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसाच्या मनाची उलघाल, दैन्य, कोंडमार, दारिद्रय, यातना, उपेक्षा, अवहेलना, अगतिकता, हतबलता, ओढग्रस्तता, ताण व आर्थिक शोषण इत्यादींमधून भोगावे लागणारे दु:ख जगावेलागणारेजिणे बोराडे ह्यांच्या साहित्यातून येते. नरहर कुरुंदकर 'वानवळा'च्या प्रस्तावनेत म्हणतात, ''जीवनातील बारीक - सारीक भावनांच्या हेलकाण्याची नोंद आपण करू शकतो काय, याचा बोराडे यांनी सतत प्रयत्न केला आहे. त्यांच्यासाठी ग्रामीण जीवन म्हणजे ग्रामीण जनतेचे समूहमन आणि या समूहमनातील सर्व लहान मोठे तरंग. असे हे स्वरूप आहे. त्यातून बोराडयांच्या कथेच्या सामर्थ्य आणि मर्यादांचा उगम होत असतो.''[२४] मराठवाडयातील ठसठशीत अनुभव, स्त्रीजीवनाचे प्रश्न, सामाजिक समस्या, बालमनातील भावनात्मक भावतरंग, विनोद व लैंगिक आकर्षण हे त्यांच्या कथालेखनाचे प्रमुख विषय होत. लैंगिक विषय हे त्यांचे दुसरे मोठे आकर्षण पण त्याकडे ते गांभीर्याने अजून वळलेले दिसत नाहीत. ह्या सर्वविषयांमधून त्यांची स्वत्वशोधाची मोठी धडपड असते. कारण त्यांचा जन्मच मुळी मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील आहे.

*आनंद यादव :*

'खळाळ', 'मातीखालची माती', 'डवरणी' ह्या कथासंग्रहांमधून यादवांनी ग्रामीण शेतमजुरांची दु:खे रंगविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण जीवनातील दु:खाचा आणि कष्टाचा अनुभव असणारे यादव

चिंतनशीलतेला अधिक महत्त्व देतात. दारिद्र्यामुळे होणारी ओढाताण, कष्ट करणाऱ्याविषयी तळमळ, अगतिकता, लाचारी, अर्थशून्यता, तसेच अत्यंत उपेक्षित जीवन जगणारी माणसे, शेतकऱ्यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा इ. चित्रणामुळे यादवांची कथा अधिक सकस बनली. तिला काव्यात्मकतेकडेही नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'खळाळ' मधील कथांमधून हे लक्षात येते.

ग्रामीण जीवनातील ताणतणावांबरोबरच त्यांना अनुकूल असे वातावरण यादव आपल्या कथांमधून निर्माण करतात. त्यांच्या व्यक्तिरेखा दु:खी असल्या, तरी त्या दु:ख सांगत बसत नाहीत. 'राजावार्णी' ही कथा ह्या बाबतीत महत्त्वपूर्ण वाटते.[२५] बोली भाषेचाही वापर करून त्यांनी कथेला जिवंतपणा आणला. ग्रामीण कथेच्या दुसऱ्या टप्प्याचे श्रेय आनंद यादवांना दिले जाते. ते त्यांच्या ह्या वाङ्मयीन कर्तृत्त्वामुळेच.

*द. ता. भोसले :*

साठोत्तरी ग्रामीण लेखकांमध्ये द. ता. भोसले ह्यांचा समावेश होतो. ग्रामीण जीवनातील दु:खाबरोबर विनोदाचेही चित्रण त्यांच्या काही कथामधून येते, ग्रामीण जीवन, ग्रामसंस्कृती, राजकारण आणि सुधारणा ह्यांचा ग्रामीण स्तरावर झालेला जो परिणाम आहे त्याचे चित्रण त्यांच्या कथांमधून येते. 'अनावर' ह्या कथेत धर्माचे गाव धरण बांधल्यामुळे उठते, त्याचे पुनर्वसन होते. पण जुने गाव, व जुन्या आठवणी तो विसरू शकत नाही. ग्रामीण माणसाचे त्याच्या आईवर जेवढे प्रेम असते, तेवढेच प्रेम काळया आईवर (शेती) व तेवढेच आईपांढरीवर (गावावर) असते, अशा आशयाची ही कथा आहे. ग्रामीण स्त्रियांची होणारी घुसमट हा ही त्यांच्या कथेचा प्रमुख विषय आहे. 'पाऊस', 'जहाज','कोसळलेली' ह्या कथा ह्या दृष्टीने लक्षणीय वाटतात. गावातील राजकारण व त्याचा जनसामान्यांवर होणारा दुष्परिणाम हे त्यांच्या 'निवडणूक' ह्या कथेमधून दिसते. ह्या कथेत ग्रामपंचायतीच्या निवडनुकीत कान्होजीराव व भाऊसाहेब ह्यांच्या भांडणात चांगा म्हाराचे खोपटे जाळले जाते. ग्रामीण जीवनाचे अशा प्रकारचे अनुभव मांडणारी त्यांची कथा येथे उल्लेखनीय वाटते.

*चंद्रकुमार नलगे :*

१९६०-६२ नंरत नलगे ह्यांनी आपल्या कथालेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कथांमधून ग्रामीण परिसराचा व संवादातून येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा परिसरातील बोलीचा प्रत्यय येतो. त्यांच्या कथांमध्ये कल्पकता, रंजनात्मकता व अद्‌भुतता दिसून येते. त्यांची 'अंगाई' सारखी कथा दैवतकथेच्या / दंतकथेच्या वळणाची वाटते, तर 'खुळा' सारख्या कथेमधून नलगे ह्यांच्या लेखनातील रंजकता

दिसते. ह्या कथेतील नामू हिराचे लग्न झाल्यापासून झुरत जातो आणि ज्या दिवशी हिरा नांदायला जाते, त्याच दिवशी वळवाचा पाऊस होतो. त्या पावसाच्या पाण्यात नामू ओढयातून वाहून जातो. त्याचे प्रेत सापडते, तेंव्हा त्याच्या खिशात विडयाच्या थोटक्याबरोबरच डोरल्यासह काळी पोत सापडते, हे वाचकांना रंजक वाटावे असेच आहे. त्यांच्या कथांमधून वारणा खोरे परिसर, तापणारे ऊन, नदी, कापशी व माणगाव ही गावे, तेथे आढळणारी मुलखावेगळी माणसे मनाला चुटपुट लावून जातात.

*महादेव मोरे :*

महाराष्ट्र आणि कर्नाटक ह्या सीमेलगतचा निपाणीचा परिसर मोरे ह्यांच्या कथांमधून येतो. तंबाखू आणि नागवेलीच्या पानाचे मळेच्यामळे त्यांच्या कथांमधून साकार होतात 'फटकूर' ह्या कथेत तंबाखूच्या वखारीचा उल्लेख येतो. त्यांच्या कथांमधून येणारी माणसे ही समाजाच्या तळागाळातील, उपेक्षित आणि बरीचशी मार्ग चुकलेली अशी आहेत. जणूकाही शापित माणसांचे वेगळे विश्व साकारणारी त्यांची कथा वाटते. त्यांच्या कथेतून सर्वच स्तरातील व्यक्ती येतात. 'धंदा', 'भोगवटा', 'गायकुली' ह्या कथांमधून त्यांनी दु:ख, अज्ञान, दारिद्रय व परिस्थिती ह्यांच्या भोवऱ्यात सापडणारी माणसे चित्रित केली. त्याचबरोबर खेडयातील परिवर्तन आणि राजकारणात भरडल्या जाणाऱ्या व्यक्ती ह्यांचे चित्रण त्यांच्या कथांमधून विशेषत्वाने येते.

*चारूता सागर :*

इ.स. १९७० च्या जवळपास लेखन करणारे एक उल्लेखनीय कथाकार चारूता सागर होत. त्यांचा 'नागीन' हा कथासंग्रह ग्रामीण कथेच्या दृष्टीने लक्षणीय आहे. त्यांच्या लेखनाचे सर्व विषय हे ग्रामीण जीवनाशी निगडीत व अनुभवसंपन्न असे आहेत. मात्र काही वेळेस ते वास्तवापासून दूर गेलेले दिसतात व कथेच्या मांडणीत स्वत:ला हरवून बसतात. त्यामुळे मुख्य विषय बाजूला सरकताना दिसतो. त्यातून कथेत ठिसुळपणा येतो. पारंपरिक पध्दतीत नागाला विशेष महत्त्व आहे. तो स्त्रियांचा भाऊ समजला जातो. नागनागिनीचे जोडपे पाहणे शुभ मानले जाते. नागाविषयी काही समजुती पहावयास मिळतात. जसे, नागाचे जोडपे मारू नये, जोडपे पाहिल्यास पांघरूण घालावे, एकटा नाग मारला, तर नागीन डूख धरते. 'नागीन' ह्या कथेत सागरांनी हाच विषय हाताळला आहे. त्यांच्या काही कथा वास्तवतेचे भीषण रूप घेऊन जन्मतात. परंतु त्यांच्यातील सूचकते अभावी त्या कथा उरत नाहीत सहजरीत्या वास्तवतेचे गांभीर्य संपवताना दिसतात. ह्या दृष्टीने त्यांची 'दावं' ही कथा लक्षणीय वाटते.

*भास्कर चंदनशिव :*

१९७०-७५ च्या दरम्यान लक्षणीय ग्रामीण कथालेखन करणारे कथाकार म्हणून भास्कर चंदनशिव ह्यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या कथालेखनाचा परिसर हा मराठवाडयातील बीड,उस्मानाबाद व लातुर ह्या जिल्ह्यांच्या सीमारेषेवरील आहे. तेथील भौगोलिक वेगळेपण, प्रदेशवैशिष्टय अतिशय सूचकपणे त्यांच्या कथांमधून येते. प्रामुख्याने परिसराचा वैराणपणा, सततचा दुष्काळ व वाढती उपासमारी, कुचंबलेपणा, शैक्षणिक मागासलेपण व निसर्गस्वाधीन शेती, भांडणतंटे, गृहकलह, दूषितपणा इत्यादींचे चित्रण त्यांच्या कथामधून येते. त्यांच्या कथेत दिसून येणारी बहुसंख्य माणसे दु:ख भोगणारी, भिन्नभिन्न स्वभावधर्मी अशी आहेत. त्यांची 'मरणकळा' ही कथा मालमत्तेच्या गृहकलहातून एका निष्पाप बालकाची बळी घेऊ पाहणाऱ्या व्यक्तीच्या स्वभाव दर्शनाची कथा आहे, तर 'भूक' ही कथा मूल हवे म्हणून तळमळणारी भाभी आणि कुत्र्यावर मुलाप्रमाणे प्रेम करणारी व्यक्तिरेखा ह्यांचे डोळस चित्रण करणारी आहे. समाजातील शोषित आणि शोषक पिढीचे वास्तव चित्रण चंदनशिव ह्यांच्या कथांमधून येते.

## १.४. समारोप :

मराठी कथावाङ्मयाची वाटचाल व तिच्यामधील ग्रामीण कथाकारांचे योगदान पाहत असताना आपण मराठी कथावाङ्मयाच्या विकासाचे विविध टप्पे लक्षात घेतले व त्यांच्या अनुषंगाने ग्रामीण कथाकारांनी मराठी कथेला कसे समृध्द केले, ते पाहिले. पहिल्या टप्प्यात साधारणत: हरिभाऊ व समकालीन सुखठणकर, सरदेसाई, ठोकळ, दिघे, श्री. म. माटे ह्यांनी मराठी कथेला अद्भुतरम्यतेपासून मुक्त करून वास्तवात आणले. येथे तिच्या विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण होतो.

१९२० च्या दरम्यान मराठीत 'लघुकथा' हा वाङ्मयप्रकार स्थिर झाला. हरिभाऊंच्या काळात तो स्फुट स्वरूपात होता, तर १९४५ च्या दरम्यान मराठी कथा 'नवकथा' ह्या नावाने ओळखली जाऊ लागली. ह्याच काळात मराठी कथावाङ्मयाच्या विकासाचा दुसरा टप्पा सुरू होतो.त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकर अग्रणी होते. शंकर पाटील, द.मा.मिरासदार,उध्दव शेळके, रणजित देसाई, ग. दि. माडगूळकर व सरोजिनी बाबर इत्यादींनी मराठी कथेच्या विकासात मोलाची भर घातली व मराठी कथा समृध्द केली.

१९६० पर्यंतच्या मराठी कथेचे स्वरूप पाहता नागर कथेत तोच तो पणा आलेला होता व मराठी कथेचा व्हावा, तेवढा विस्तार झाला नव्हता. स्वातंत्र्यानंतर शासनाच्या शिक्षणप्रसारामुळे खेडयापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचली.उपेक्षित व अस्पृश्याची मुले ह्या शिक्षणाचा लाभ घेऊ लागली. सुशिक्षित

तरूणांना नवी दृष्टी आली, नवे भान आले व ह्यातून मराठी कथावाङ्मयाच्या विकासाचा तिसरा टप्पा निर्माण झाला. त्यामुळे मराठी कथा विविध अंगांनी विस्तारत गेली. त्यात रा. रं. बोराडे, आनंद यादव, द.ता.भोसले, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक, सखा कलाल, चारूता सागर, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव हे व असे कितीतरी नवे-जुने कथाकार मराठी कथा समृध्द करीत होते. त्यामध्ये काही स्वयंप्रकाशात तेजाळणारे बिनीचे कथाकार होते, तर काही परप्रकाशात देखील स्वत:चे अस्तित्व टिकवून होते. म. ना. अदवंतांनी ह्या कथाकारांविषयी पुढील उद्‌गार काढले आहेत, ''त्यांच्या कथांतून आलेला आशय जिवंत व प्रत्ययकारी वाटू लागला. त्याची अभिव्यक्ती पण ग्रामीण भाषेतून होऊ लागली. भाषा समृध्द करण्याचे फार मोठे कार्य या ग्रामीण कथाकारांनी केले.''[२६]

----------: ❈❈❈❈❈ :----------

# संदर्भ व टीपा:

*(जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावी.)*


१. शेवडे इंदुमती, 'मराठी कथा: उगमआणि विकास',सोमय्या पब्लिकेशन्स् प्रा.लि., मुंबई, १९७३,पृ.७.

२. पहा: कुलकर्णी श्री. रं., 'प्राचीन मराठी गद्य: प्रेरणा आणि परंपरा', सिंधू प्रकाशन, मुंबई,१९७०,पृ.७६.

३. गाडगीळ गंगाधर, 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृती : १९६६, पृ.२२५.

४. हातकणंगलेकर म.द., 'ग्रामीण कथा: रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.२८.

५. पहा: यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती: १९९३, पृ.१०.

६. पहा: यादव आनंद, 'ग्रामीण कथेचा स्वरूपविचार', समाविष्ट: 'मातीतलं मोती', कुलकर्णी पंडित अनंत , यादव आनंद (संपा.), कुलकर्णी ग्रंथागार, पुणे,१९७०, पृ.३.

७. पहा: यादव आनंद, उनि., पृ.११.

८. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य: चळवळ आणि आम्ही', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९६, पृ.६९.

९. पहा: यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृती: १९९३, पृ.१५.

१०. तत्रैव, पृ.१६.

११. पहा: तत्रैव, पृ.१८.

१२. पहा: फडके भालचंद्र, 'सहा कथाकार', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. ३१.

१३. राजाध्यक्ष विजया, 'वीणा', मे १९५९.

१४. हातकणंगलेकर म.द. व पवार गो.मा.(संपा.), 'मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ. ४१.

१५. अदवंत म. ना., "मराठी कथा: काल आणि आज", 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', पुणे, दिवाळी अंक १९८५, पृ.११८.

१६. पवार गो. मा.(संपा.), "प्रस्तावना", 'ओझं', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७, पृ.६.

१७. हातकणंगलेकर म.द., "ग्रामीण कथा", 'मराठी कथा: रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.४२.

१८. शेवडे इंदुमती, उनि., पृ.३२४.

१९. हातकणंगलेकर म. द., उनि., पृ.४३.

२०. कुळकर्णी वा. ल. (संपा.), "माझ्या बापाची पेंड",'मिरासदारी', कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती: १९७५, पृ. ८.

२१. बांदिवडेकर चंद्रकांत, "कथा", समाविष्ट: 'मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप', हातकणंगलेकर म. द. व पवार गो. मा. (संपा.), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ.१५०.

२२. पहा: यादव आनंद, उनि., पृ.२२.

२३. साठे अण्णाभाऊ, 'कृष्णाकाठच्या कथा', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,द्वितीयावृत्ती: १९७७, पृ.५.

२४. कुरुंदकर नरहर, "प्रस्तावना", समाविष्ट : 'वानवळा' (रा. रं. बोराडे हयांचा संपादित कथासंग्रह), कुरुंदकर नरहर (संपा.), अमेय प्रकाशन, नागपूर, १९७९, पृ. १५.

२५. पहा: यादव आनंद, "राजावाणी", समाविष्ट : 'खळाळ', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, तृतीयवृत्ती: १९९३, पृ. १०-१३.

२६. अदवंत म. ना., 'कथावाङ्मय', समाविष्ट : 'प्रदक्षिणा', कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती:१९७६,पृ. १८९.


----------: ❋❋❋❋❋ :----------